क्रि.कि.अर्ज नं.३७/२०२६

Exh. 14/C

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल

## यांचे कोर्टात...

| | | |
|---|---|---|
| हिरण्य पॅकेजींग प्रा.लि. तर्फे प्रोप्रा. श्री. प्रविण तुकाराम वाईंगडे | } | अर्जदार |
| विरुध्द | | |
| महाराष्ट्र सरकार | } | वि.प. |

Order
A.P.P. to say

J.M.F.C.
11.06.2026

**यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज की,**

प्रस्तुत कामी यातील अर्जदार यांनी सदरचा जप्त/सिल केलेली मिळकत अर्जदार यांचे ताबेत मिळणेसाठी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तथापि, सदर अर्जाच्या खालील नमुद केलेल्या मुद्देमालाचे वर्णन अनावधानाने व नजरचुकीने नमुद करणेचे राहून गेलेला आहे. तरी खालीलप्रमाणे मुद्देमालाचे वर्णन :

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १. | कागदी पुठ्याचे बॉक्स तयार करणेचे आरएस ४ प्रिटींग मशीन त्याची अंदाजे किंमत जप्त अं.कि.रु. | १८,००,०००/- |
| २. | जॉन डिस्टलरी खाकी रंगाचे कागदी पुठ्याचे बॉकस १०००० बंडल जप्त अं.कि.रु. | १,००,०००/- |

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.06.11 17:47:25 +0530

वरील प्रमाणे वर्णनाचा मुद्देमाल सदर गुन्ह्याचे कामी जप्त असलेने सदर कामी दाखल केलेल्या अर्जामध्ये वरीलप्रमाणे वर्णनाचा मुद्देमाल

समाविष्ठ करणेस परवानगी मिळावी. तशी दुरुस्ती केलेस वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट तशी दुरुस्ती न झालेस अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

सबब अर्जदार यांना त्यांचे मुळ अर्जामध्ये जप्त मुद्देमालाच्या वर्णनामध्ये वर नमुद केलेप्रमाणे मुद्देमाल समाविष्ठ करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी ही नम्र विनंती.

कागल

ता. ११/०६/२०२६

अर्जदार